# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता
**{सार्व.आरो.अभि. विभाग}** १०००+२०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा, आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करणे.

सध्या नागपूर शहरामधून एकूण अंदाजे ११००-१२०० मेट्रीक टन प्रति दिन घनकचऱ्याची निर्मिती होते. कचरा भांडेवाडी येथील डम्पींग यार्ड मध्ये जमा करण्यात येत आहे. तथापि स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)-१.० अंतर्गत नागपूर शहराकरीता घनकचरा व्यवस्थापनाचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल शासनाद्वारे १४ मे २०२१ रोजी मंजूर करण्यात आला. त्यामध्ये अंतर्भूत प्रमुख घटक् ६०० TPD Composting Plant आणि ३८० MTPD MRF Centre करीता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत एकत्रितरित्या १०००+२०% ओला व सुखा कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता मनपाद्वारे दिनांक २३ डिसेंबर २०२१ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. यास मा. महासभा, मनपा ठराव क्र. ९९/वि.क्र.५६, दिनांक २२.०६.२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. या निविदेच्या प्रथम कॉल मधील दिनांक ०४.०१.२०२२ च्या Pre-bid meeting मध्ये इच्छुक निविदाकारांनी विचारलेल्या प्रश्नांचे स्पष्टीकरण करण्यात येवून निविदेची मुदत दिनांक १८.०२.२०२२ पर्यंत वाढविण्यात आली.

सदरहू निविदेमध्ये जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने दुसऱ्यांदा Pre-bid meeting दिनांक ०४.०२.२०२२ रोजी घेण्यात आली. यामध्ये नेदरलँड ची कंपनी M/s. SusBDe यांनी सहभाग नोंदविला आणि विश्वपातळीवर अनुभव स्विकारण्याची विनंती याअगोदरच दिनांक २४.०१.२०२२ रोजी मेलद्वारे मा. आयुक्त, मनपा यांना केलेली होती. त्यासोबतच त्यांनी प्रकल्पाचा देखभाल व दुरुस्ती कालावधी अतिरिक्त १५ वर्षांनी वाढवून देणे, प्रकल्पाकरीता २९ एकर जागा मिळण्याबाबत मागणी केली आणि zero waste with no tipping fees चा प्रस्ताव सादर केला. यावर नागपूर महानगरपालिकेतर्फे विचारविमर्श करुन प्राप्त आक्षेपांचे निराकरण करण्यात आले आणि विश्वपातळीवर निविदाकारांनी सहभाग घेता यावा याकरीता निविदेमध्ये आवश्यक तांत्रिक व आर्थिक अटी शर्तींचा समावेश करण्यात आला, तसेच निविदाकारांनी मागणी केल्यानुसार निविदेची मुदत दिनांक २८.०२.२०२२ पर्यंत वाढवून देण्यात आली. परंतू या कालावधीदरम्यान मुदत संपल्यावर एकही निविदा प्राप्त झाली नाही.

करीता पुन:श्च निविदा (2nd Call) दिनांक १०.०३.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्याची अंतिम मुदत दिनांक २५.०३.२०२२ पर्यंत होती. तथापि इच्छुक निविदाकार यांनी पुन:श्च दिनांक ११.०४.२०२२ पर्यंत मुदतवाढ मागितल्याने ती देण्यात आली. वाढीव मुदतीत दोन निविदाकारांच्या (M/s Antony Lara Enviro Solutions Pvt. Ltd. आणि M/s. SusBDe Holding B.V. (JV)) निविदा प्राप्त झाल्या. तांत्रिक निविदा दिनांक १३.०४.२०२२ रोजी उघडण्यात येवून प्राथमिक तपासणी मनपाचे सल्लागार मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस यांचेमार्फत करण्यात येवून त्यांना काही मुद्यांचे स्पष्टीकरण सादर करण्यास्तव दिनांक १०.०५.२०२२ रोजी सात कार्यालयीन दिवसांची मुदत देण्यात आली असता M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांनी दिनांक २५.०५.२०२२ पर्यंत मुदत देण्यास विनंती केली.

दरम्यान मा. आयुक्त, मनपा यांचे दिनांक २०.०४.२०२२ च्या आदेशान्वये Project Evaluation and Technical Scrutiny Committee गठीत केली. त्याअनुषंगाने सदरहू तांत्रिक निविदा प्राथमिक तपासणी अहवाल आणि संपूर्ण कागदपत्रे समिती समक्ष दिनांक ११.०५.२०२२ च्या सभेत ठेवण्यात आले. याबाबत समितीच्या पुढे दिनांक ०२.०६.२०२२ आणि ११.०७.२०२२ रोजी सभा घेण्यात आल्या. या सभांमध्ये प्राप्त निर्देशानुसार दोन्ही निविदाकारांना तांत्रिक निविदा कागदपत्रांबाबत सुस्पष्टता

व स्पष्टीकरण सादर करण्यास्तव संधी देण्यात आली. दिनांक ११.०७.२०२२ रोजीच्या समितीच्या सभेत दोन्ही निविदाकारांना तांत्रिकदृष्टया पात्र ठरविण्यात आले व त्यांना गुणांकन देण्यात आले.

| Sr. No. | Name of Bidders | Total Marks | Marks Allotted |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Antony Lara Enviro Solutions Pvt. Ltd., Thane | 100 | 77 |
| 2 | M/s. SusBDe Holding B.V., Kalyan JV/Consortium (Financial) Partner – M/s Ashmi Road Carriers Pvt. Ltd.(JV), Nagpur | 100 | 80.5 |

दोन्ही निविदाकारांना १०० पैकी ७० गुणांपेक्षा जास्त प्राप्त झाल्याने त्यांच्या आर्थिक निविदा दिनांक २५.०७.२०२२ रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांची no tipping fees with Royalty to NMC ची उच्चतम निविदा प्राप्त झाली. सदरहू आर्थिक निविदेचे मनपाचे सल्लगार यांचे मार्फत तपासणी करण्यात येवून अहवाल २७.०७.२०२२ रोजी सादर करण्यात आला असता काही मुद्यांबाबत सुस्पष्टता सादर करण्यास्तव आणि सादरीकरण प्रस्तुत करण्याकरीता दिनांक २८.०७.२०२२ रोजी पत्र देण्यात आले.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांनी दिनांक २९.०८.२०२२ रोजी सदरहू प्रकल्पाकरीता विस्तृत प्रकल्प अहवाल दिनांक २९.०८.२०२२ रोजी मनपास सादर केला. त्याचे Technical vetting निरी, नागपूर या संस्थेमार्फत दिनांक १९.०९.२०२२ रोजी प्राप्त झाले, त्याची प्रत निविदाकारास दिनांक ०३.१०.२०२२ रोजी देण्यात आली. तद्नंतर M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांची उच्चतम आर्थिक निविदा (Zero Tipping Fees with Annual Royalty to NMC) स्विकारण्यात येवून त्यांना Letter of Intent दिनांक ०६.१०.२०२२ रोजी देण्यात आले.

कंपनीद्वारे Lead Company नावातील बदल आणि सुधारीत प्रकल्पाची किंमत गृहीत धरावी याकरीता दिनांक ०७.१०.२०२२ रोजी पत्र दिले. यावर Company Secretary यांचे अभिमत घेण्यात येवून Lead Company च्या नावातील बदल या स्थितीत निविदेच्या अटी व शर्तीनुसार स्विकारता येणार नसल्याचे कंपनीला कळविण्यात आले. तसेच प्रकल्पाची किंमत कंपनीने सादर केलेल्या आर्थिक निविदेनुसारच असल्याचे त्यांना दिनांक १३.१०.२०२२ रोजी कळविण्यात आले. तद्नंतर कंपनीने Performance Bank Guarantee ऐवजी Surety Bond स्विकारण्याबाबत दिनांक १९.१०.२०२२ रोजी पत्राद्वारे विनंती केली असता निविदेच्या अटी व शर्तीनुसार ती स्विकारता येणे शक्य नसल्याचे कळविण्यात आले.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) आणि मनपाचे अधिकारी यांच्यातील आपसी चर्चेनंतर Concession Agreement चा Final Draft कंपनीला दिनांक १८.११.२०२२ ला देण्यात आलेला आहे. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाकाराने नमुद कामाकरीता करारनामा करण्यापूर्वी SPV तयार करणे, Performance Bank Guarantee आणि Development fee देणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्पाकरीता लागणारी जागा वार्षिक भाडेतत्वावर मौजा-भांडेवाडी, ख.क्र. ११६(P), ११७(P), १००(P), ११८(P), ११९(P), १३०(P), १३१(P), १३२(P), १२२(P) एकूण आराजी क्षेत्रफळ ९.५६ हे.आर. आणि मौजा-भांडेवाडी, ख.क्र. १०२(P), ११३(P), ११४(P), ११५(P) एकूण आराजी क्षेत्रफळ ९ एकर दैनंदिन येणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्याकरीता नविन प्लान्ट सुरु होईस्तोवर व शहरातून दैनंदिन येणारा कचरा (१०००±२०%) देण्यास मनपा तयार आहे.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांनी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited या नावाने SPV दिनांक २८.११.२०२२ रोजी तयार केलेली असून कंपनीद्वारे Performance Bank Guarantee (१०% of the capital cost of the project) Rs. ३१.९ Crs. आणि Development fee (१% of the capital cost of the project) Rs. ३.१९ Crs. करारनाम्यापूर्वी मनपास दयावयाची आहे. तसेच कंपनीद्वारे मनपास रॉयल्टी स्वरुपात रु. १५.०० लक्ष प्रति वर्ष किंवा दोन्ही पार्टयांचे संमतीने ठरविण्यात आलेली रक्कम संपूर्ण प्रकल्पाचे कालावधीत दयावयाची आहे.

करीता, उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव, भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १०००+२०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनांस, बांधा,

स्वमालकीचा करा, वापरा, आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करण्याकरीता निविदा प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेली कंपनी M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांना प्रकल्प उभारणीकरीता देण्याच्या व आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपः-

१. सविस्तर माहिती नस्तीमधे उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-355/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 28 / 04 /2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १०००+२०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा, आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करणे.

सध्या नागपूर शहरामधून एकूण अंदाजे ११००-१२०० मेट्रीक टन प्रति दिन घनकचऱ्याची निर्मिती होते. कचरा भांडेवाडी येथील डम्पींग यार्ड मध्ये जमा करण्यात येत आहे. तथापि स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)-१.० अंतर्गत नागपूर शहराकरीता घनकचरा व्यवस्थापनाचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल शासनाद्वारे १४ मे २०२१ रोजी मंजूर करण्यात आला. त्यामध्ये अंतर्भूत प्रमुख घटक् ६०० TPD Composting Plant आणि ३८० MTPD MRF Centre करीता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत एकत्रितरित्या १०००+२०% ओला व सुखा कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता मनपाद्वारे दिनांक २३ डिसेंबर २०२१ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. यास मा. महासभा, मनपा ठराव क्र. ९९/वि.क्र.५६, दिनांक २२.०६.२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. या निविदेच्या प्रथम कॉल मधील दिनांक ०४.०१.२०२२ च्या Pre-bid meeting मध्ये इच्छुक निविदाकारांनी विचारलेल्या प्रश्नांचे स्पष्टीकरण करण्यात येवून निविदेची मुदत दिनांक १८.०२.२०२२ पर्यंत वाढविण्यात आली.

सदरहू निविदेमध्ये जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने दुसऱ्यांदा Pre-bid meeting दिनांक ०४.०२.२०२२ रोजी घेण्यात आली. यामध्ये नेदरलँड ची कंपनी M/s. SusBDe यांनी सहभाग नोंदविला आणि विश्वपातळीवर अनुभव स्विकारण्याची विनंती याअगोदरच दिनांक २४.०१.२०२२ रोजी मेलद्वारे मा. आयुक्त, मनपा यांना केलेली होती. त्यासोबतच त्यांनी प्रकल्पाचा देखभाल व दुरुस्ती कालावधी अतिरिक्त १५ वर्षांनी वाढवून देणे, प्रकल्पाकरीता २९ एकर जागा मिळण्याबाबत मागणी केली आणि zero waste with no tipping fees चा प्रस्ताव सादर केला. यावर नागपूर महानगरपालिकेतर्फे विचारविमर्श करुन प्राप्त आक्षेपांचे निराकरण करण्यात आले आणि विश्वपातळीवर निविदाकारांनी सहभाग घेता यावा याकरीता निविदेमध्ये आवश्यक तांत्रिक व आर्थिक अटी शर्तीचा समावेश करण्यात आला, तसेच निविदाकारांनी मागणी केल्यानुसार निविदेची मुदत दिनांक २८.०२.२०२२ पर्यंत वाढवून देण्यात आली. परंतू या कालावधीदरम्यान मुदत संपल्यावर एकही निविदा प्राप्त झाली नाही.

करीता पुन:श्च निविदा (२nd Call) दिनांक १०.०३.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्याची अंतिम मुदत दिनांक २५.०३.२०२२ पर्यंत होती. तथापि इच्छुक निविदाकार यांनी पुन:श्च दिनांक ११.०४.२०२२ पर्यंत मुदतवाढ मागितल्याने ती देण्यात आली. वाढीव मुदतीत दोन निविदाकारांच्या (M/s Antony Lara Enviro Solutions Pvt. Ltd. आणि M/s. SusBDe Holding B.V. (JV)) निविदा

प्राप्त झाल्या. तांत्रिक निविदा दिनांक १३.०४.२०२२ रोजी उघडण्यात येवून प्राथमिक तपासणी मनपाचे सल्लागार मे. आर जगताप ॲन्ड असोसिएटस यांचेमार्फत करण्यात येवून त्यांना काही मुद्यांचे स्पष्टीकरण सादर करण्यास्तव दिनांक १०.०५.२०२२ रोजी सात कार्यालयीन दिवसांची मुदत देण्यात आली असता M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांनी दिनांक २५.०५.२०२२ पर्यंत मुदत देण्यास विनंती केली.

दरम्यान मा. आयुक्त, मनपा यांचे दिनांक २०.०४.२०२२ च्या आदेशान्वये Project Evaluation and Technical Scrutiny Committee गठीत केली. त्याअनुषंगाने सदरहू तांत्रिक निविदा प्राथमिक तपासणी अहवाल आणि संपूर्ण कागदपत्रे समिती समक्ष दिनांक ११.०५.२०२२ च्या सभेत ठेवण्यात आले. याबाबत समितीच्या पुढे दिनांक ०२.०६.२०२२ आणि ११.०७.२०२२ रोजी सभा घेण्यात आल्या. या सभांमध्ये प्राप्त निर्देशानुसार दोन्ही निविदाकारांना तांत्रिक निविदा कागदपत्रांबाबत सुस्पष्टता व स्पष्टीकरण सादर करण्यास्तव संधी देण्यात आली. दिनांक ११.०७.२०२२ रोजीच्या समितीच्या सभेत दोन्ही निविदाकारांना तांत्रिकदृष्टया पात्र ठरविण्यात आले व त्यांना गुणांकन देण्यात आले.

| Sr. No. | Name of Bidders | Total Marks | Marks Allotted |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Antony Lara Enviro Solutions Pvt. Ltd., Thane | 100 | 77 |
| 2 | M/s. SusBDe Holding B.V., Kalyan JV/Consortium (Financial) Partner – M/s Ashmi Road Carriers Pvt. Ltd.(JV), Nagpur | 100 | 80.5 |

दोन्ही निविदाकारांना १०० पैकी ७० गुणांपेक्षा जास्त प्राप्त झाल्याने त्यांच्या आर्थिक निविदा दिनांक २५.०७.२०२२ रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांची no tipping fees with Royalty to NMC ची उच्चतम निविदा प्राप्त झाली. सदरहू आर्थिक निविदेचे मनपाचे सल्लगार यांचे मार्फत तपासणी करण्यात येवून अहवाल २७.०७.२०२२ रोजी सादर करण्यात आला असता काही मुद्यांबाबत सुस्पष्टता सादर करण्यास्तव आणि सादरीकरण प्रस्तुत करण्याकरीता दिनांक २८.०७.२०२२ रोजी पत्र देण्यात आले.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांनी दिनांक २९.०८.२०२२ रोजी सदरहू प्रकल्पाकरीता विस्तृत प्रकल्प अहवाल दिनांक २९.०८.२०२२ रोजी मनपास सादर केला. त्याचे Technical vetting निरी, नागपूर या संस्थेमार्फत दिनांक १९.०९.२०२२ रोजी प्राप्त झाले, त्याची प्रत निविदाकारास दिनांक ०३.१०.२०२२ रोजी देण्यात आली. तद्नंतर M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांची उच्चतम आर्थिक निविदा (Zero Tipping Fees with Annual Royalty to NMC) स्विकारण्यात येवून त्यांना Letter of Intent दिनांक ०६.१०.२०२२ रोजी देण्यात आले.

कंपनीद्वारे Lead Company नावातील बदल आणि सुधारीत प्रकल्पाची किंमत गृहीत धरावी याकरीता दिनांक ०७.१०.२०२२ रोजी पत्र दिले. यावर Company Secretary यांचे अभिमत घेण्यात येवून Lead Company च्या नावातील बदल या स्थितीत निविदेच्या अटी व शर्तीनुसार स्विकारता येणार नसल्याचे कंपनीला कळविण्यात आले. तसेच प्रकल्पाची किंमत कंपनीने सादर केलेल्या आर्थिक निविदेनुसारच असल्याचे त्यांना दिनांक १३.१०.२०२२ रोजी कळविण्यात आले. तद्नंतर कंपनीने Performance Bank Guarantee ऐवजी Surety Bond स्विकारण्याबाबत दिनांक १९.१०.२०२२ रोजी पत्राद्वारे विनंती केली असता निविदेच्या अटी व शर्तीनुसार ती स्विकारता येणे शक्य नसल्याचे कळविण्यात आले.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) आणि मनपाचे अधिकारी यांच्यातील आपसी चर्चेनंतर Concession Agreement चा Final Draft कंपनीला दिनांक १८.११.२०२२ ला देण्यात आलेला आहे. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाकाराने नमुद कामाकरीता करारनामा करण्यापूर्वी SPV तयार करणे, Performance Bank Guarantee आणि Development fee देणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्पाकरीता लागणारी जागा वार्षिक भाडेतत्वावर मौजा-भांडेवाडी, ख.क्र. ११६(P), ११७(P), १००(P), ११८(P), ११९(P), १३०(P), १३१(P), १३२(P), १२२(P) एकूण आराजी क्षेत्रफळ ९.५६ हे.आर. आणि मौजा-भांडेवाडी, ख.क्र. १०२(P), ११३(P), ११४(P), ११५(P) एकूण आराजी क्षेत्रफळ ९ एकर दैनंदिन येणाऱ्या

कचऱ्याचे वर्गीकरण करण्याकरीता नविन प्लान्ट सुरु होईस्तोवर व शहरातून दैनंदिन येणारा कचरा (१०००±२०%) देण्यास मनपा तयार आहे.

M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांनी M/s. SusBDe LOC Nagpur Private Limited या नावाने SPV दिनांक २८.११.२०२२ रोजी तयार केलेली असून कंपनीद्वारे Performance Bank Guarantee (१०% of the capital cost of the project) Rs. ३१.९ Crs. आणि Development fee (१% of the capital cost of the project) Rs. ३.१९ Crs. करारनाम्यापूर्वी मनपास दयावयाची आहे. तसेच कंपनीद्वारे मनपास रॉयल्टी स्वरुपात रु. १५.०० लक्ष प्रति वर्ष किंवा दोन्ही पाटर्यांचे संमतीने ठरविण्यात आलेली रक्कम संपूर्ण प्रकल्पाचे कालावधीत दयावयाची आहे.

करीता, उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव, भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १०००+२०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा, आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करण्याकरीता निविदा प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेली कंपनी M/s. SusBDe Holding B.V. (JV) यांना प्रकल्प उभारणीकरीता देण्याच्या व आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**